# गोंदिया जिल्ह्याच्या आर्थिक विकासात विदर्भ कोकण ग्रामिण बॅंकेने केलेला कर्जपुरवठा (२०१९—२० ते२०२१—२२)

**कु कविता बि. फुले**
संशोधक
नेवजाबाई हितकारणी कॉलेज, ब्रम्हपुरी जि.चंद्रपुर
भ्र.क्र. — ८२७५३१८९३८
Email - kavitafule@gmail.com

**डॉ. तात्याजी के. गेडाम**
मार्गदर्शक
प्राध्यापक, वाणिज्य विभाग
नेवजाबाई हितकारणी कॉलेज, ब्रम्हपुरी जि.चंद्रपुर

---

**प्रस्तावना :**

सुदृढ बॅंकिग व्यवसाय हे कोणत्याही राष्ट्राच्या आर्थिक विकासातील आधारभूत क्षेत्र आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेची वाढ ही त्या देशातील कार्यक्षम बॅंक व्यवसायावर अवलंबून असते. बॅंकेचे राष्ट्रीयीकरण म्हणजे बॅंकेची मालकी आणि व्यवस्थापन सरकारने आपल्या हाती घेणे होय. १ एप्रील १९३५ रोजी रिझर्व्ह बॅंकेची स्थापना झाली. आणि जरी रिझर्व बॅंक भाग धारकाची बॅंक म्हणून खाजगी क्षेत्रात सुरूवातीला स्थापन झाली असली तरी बॅंकेच्या व सरकारच्या धोरणात सुसत्रता असावी, देशाचा सुरळीत आर्थिक विकास व्हावा, चलनविषयक बॅंक व्यवसाय विषयक प्रश्न योग्य रितीने हाताळले जावे या दृष्टीने १ जाने १९४९ रोजी ही बॅंक भारत सरकारच्या मालकीची झाली. १ जुलै १९५५ ला स्टेट बॅंकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. १९ जुलै १९६९ ला १४ मोठया बॅंकेचे राष्ट्रीयीकरण झाले. त्या पुढीलप्रमाणे आहेत—

१) सेंटल बॅंक ऑफ इंडिया २) बॅंक ऑफ इंडिया ३) पंजाब नॅशनल बॅंक ४) बॅंक ऑफ बडोदा ५) युनायटेड कर्मशियल बॅंक ६) कॅनरा बॅंक ७) यूनायटेड बॅंक ऑफ इंडिया ८) देना बॅंक ९) सीडिकेंट बॅंक १०) युनियन बॅंक ऑफ इडिया ११) अलाहाबाद बॅंक १२) इंडियन बॅंक १३) बॅंक ऑफ महाराष्ट्र १४) इंडियन ओव्हरसिस बॅंक

अश्याप्रकारे देशातील बॅंकाच्या एकूण ठेवीपैकी ८५ प्रतीशत ठेवीवर सरकारचे नियंत्रण प्रस्थापित झाले तसेच १५ एप्रिल १९८० ला सहा बॅंकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. १) आंध्रा बॅंक २) कारपोरेशन बॅंक ३) न्यु बॅंक ऑफ इंडीया ४) ओरीएन्टल बॅंक ५) पंजाब एन्ड सिंध बॅंक ६) विजया बॅंक

भारतामध्ये राष्ट्रीयीकृत बॅंकाची संख्या २७ होती ती आता वर्ष २०१९ नुसार १२ आहे. या व्यतिरिक्त राष्ट्रीयीकृत बॅंकाची शाखाची संख्या ८५ हजार ११६ आहेत. राष्ट्रीयीकरण करण्यामागील हेतू ग्रामिण क्षेत्रातील शेतक—यांना, लघु व कुटीर उद्योगांना, बेरोजगार युवकांना कर्ज उपलब्ध व्हावे व देशाच्या विकासात हातभार लागावा.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतातील **६८.८४** टक्के जनता ही ग्रामीण भागात राहते. त्यामुळे त्यांचा मुख्य व्यवसाय शेती व शेतीसंबधीत कुटीर उद्योग व लघु उद्योग आहेत. भारतातील जोपर्यंत ग्रामीण क्षेत्राचा विकास होणार नाही तोपर्यंत ख—या अर्थाने भारताचा विकास होणार नाही. म्हणून महात्मा गांधी

म्हणायचे 'खेडे ही भारताची आत्मा आहे.' जवळपास भारतामध्ये २०११ च्या जनगणनेनुसार ६ लाख ४० हजार ९३० पेक्षा जास्त गावे असल्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला ग्रामीणमुख अर्थव्यवस्था असे म्हणण्यात येते. लोकसंख्येच्या ७० टक्के भाग आजसुध्दा आपल्या कुटुंबाची व शेतीची गुणात्मक दुष्टीने प्रगती करु शकला नाही .

ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेत क्षेत्रीय ग्रामीण बॅकाना फार महत्व आहे. १९७५ मध्ये या बॅकांना सुरुवात झाली ग्रामीण भागातील सीमांत शेतकरी, भूमीहीन शेतमजूर, ग्रामीण कारागीर, छोटे व्यवसायिक आदिंना कर्जपुरवठा करण्याच्या उद्येशाने या बॅकाची स्थापना करण्यात आली. ग्रामीण भागातील दुर्बल घटक व मागासलेल्या जाती – जमातीतील लोंकाना आर्थिक मदत करण्याची जबाबदारी या बॅका सांभाळतात. लघु उद्योजक, छोटे व्यावसायिक, लहान व्यापारी, स्वयंरोजगारातील व्यक्ती आदिंना या बॅका कर्जपुरवठा करतात. जेणेकरुन ग्रामीण भागातील रोजगाराचे प्रमाण वाढवितात. भारतात १९७५ मध्ये क्षेत्रीय बॅकाची सुरूवात झाली. मुरादाबाद, गोरखपुर, भिवानी, जयपुर, राजस्थान, माल्दा येथे ५ बॅका सुरु करण्यात आल्या. आज भारतात २८ राज्यातील जवळपास ३९८ जिल्हयात या बॅकाच्या शाखा आहेत. ग्रामीण बॅकांनी लहान शेतकरी, शेतमजुर, ग्रामीण कारागीर. लघुउद्योजक, कुटीर उद्योजक आदिंना कर्जपुरवठा केला आहे.

विदर्भ कोकण ग्रामीण बॅकेची स्थापना २८.०२.२०१३ ला झाली. 'एक राज्य एक ग्रामीण बॅक' च्या दिशेने पडणारे पाऊल म्हणून महाराष्ट्रात दुसरी मोठी ग्रामिण बॅक अस्तित्वात आली. अकोला येथे मुख्यालय असलेल्या विदर्भ क्षेत्रीय ग्रामीण बॅक व सोलापुर येथे मुख्यालय असलेल्या वैनगंगा कृष्णा ग्रामीण बॅकेचे एकत्रीकरण करण्यात आले असून नवी विदर्भ कोकण ग्रामीण बॅक अस्तिवात आली. गोंदिया जिल्हयात या बॅकेच्या एकूण २४ शाखा असून या बॅकेने जिल्हयात विविध क्षेत्राला कर्जपुरवठा करुन आर्थिक विकासात योगदान केलेले आहे.

**संशोधनाचा उददेश :**

१) गोंदिया जिल्हयात राष्ट्रीयकृत बॅकेच्या तुलनेत विदर्भ कोकण ग्रमीण बॅकेने केलेल्या कर्जपुरवठयाचा अभ्यास करणे

२) २०१९–२० ते २०२१–२२ या तीन वर्षात राष्ट्रीयकृत बॅकेच्या तुलनेत किती कर्जपुरवठा झाला आहे. याचा अभ्यास करणे.

३) गोंदिया जिल्हयाच्या आर्थिक विकासात वेगवेगळया क्षेत्राला केलेला कर्जपुरवठा याचा अभ्यास करणे.

**शोध निबंधासाठी उपयोगात येणारी संशोधन पध्दती :**

शोध निबंधातील अभ्यास हा द्वितीय संमकावर अवलंबून आहे. संमकाचे संकलन हे विषयाशी संबधित विविध पुस्तके, मासिके, वार्षिक अहवाल, वर्तमानपत्र व सांकेतिक स्थळावरुन करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात ०१ मे १९९९ रोजी भंडारा जिल्हयाचे विभाजन करण्यात आले. त्यामुळे भंडारा व गोंदिया असे दोन नवे जिल्हे निर्माण झाले. गोंदिया जिल्हयात तिरोडा, गोरेगाव, आमगाव, सालेकसा, देवरी,

सडक अर्जुनी, अर्जुनी/मोरगाव असे एकूण आठ तालुके आहेत. गोंदिया हे जिल्हयाचे ठिकाण असून एकूण क्षेत्रफळापैकी ९९.३८ टक्के क्षेत्रफळ ग्रामिण असून ६२ टक्के क्षेत्रफळ अर्धशहरी आहे. हा जिल्हा ग्रामिण व तलावांचा जिल्हा म्हणून ओळखल्या जातो. या जिल्हयात भाताचे पिक जास्त प्रमाणात घेतले जाते.

२०१९—२० ते २०२१—२२ तीन वर्षाच्या कालावधीत राष्ट्रीयकृत बॅकेच्या तुलनेत विदर्भ कोकण ग्रमीण बॅकेने खालील क्षेत्राला कर्जाच्या रुपात योगदान करुन आर्थिक विकासाला हातभार लावला आहे. यामध्ये कृषी व कृषी संलग्न क्षेत्र, लघु व कुटीर उद्योग व अन्य प्राथमिक क्षेत्र

**सारणी**

**गोंदिया जिल्हयात बॅकनिहाय व क्षेत्रनिहाय केलेला कर्जपुरवठा** (आकडे लाखात)

| अ. क्र | विवरण | २०१९— २० | | | २०२०—२१ | | | २०२१—२२ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | इतर राष्ट्रीयकृत बॅक | कृषी क्षेत्र | लघु व कुटीर उद्योग | अन्य प्राथमिक क्षेत्र | कृषी क्षेत्र | लघु व कुटीर उद्योग | अन्य प्राथमिक क्षेत्र | कृषी क्षेत्र | लघु व कुटीर उद्योग | अन्य प्राथमिक क्षेत्र |
| १ | अलाहाबाद बॅक | ८२ | ५८६ | ४६१ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | बॅक ऑफ बडोदा | ३१३७ | २६३३ | २२५६ | ३९४० | २९७२ | ३६११ | ३४२१ | ३२६१ | १८०६ |
| ३ | बॅक ऑफ इंडिया | ८७१५ | ७२८३ | ५३१६ | ९६९९ | १५३८३ | २४१८ | १२०४९ | ११३२९ | ३२३२ |
| ४ | बॅक ऑफ महाराष्ट्र | १९६ | ३८१ | २४४ | १७६४ | २३७ | २२९ | ३८८७ | २२७४ | १६३८ |
| ५ | कॅनरा बॅक | २०६७ | २६२५ | १६८२ | २७९४ | ३८६१ | ३८१० | ३४११ | ४१३१ | २२१८ |
| ६ | सेंट्रल बॅक ऑफ इडिया | २६४ | ११५३ | ३०६ | ८७४ | ८६९ | २९५ | ९१५ | १२२१ | ४११ |
| ७ | इंडियन बॅक | ८५ | ३३०५ | १७२ | ९८ | १८७६ | १८१ | ११६ | ३१३५ | ७४२ |
| ८ | इंडियन ओव्हरसिस बॅक | ० | २९४ | ८०३ | ५ | ११४९ | ४९५ | ४९ | ३०० | ४१५ |
| ९ | पंजाब नॅशनल बॅक | ७१० | ४५७१ | ९६० | ७१० | ४५७१ | ९६१ | ९४६ | ३७१६ | १०७७ |
| १० | स्टेट बॅक ऑफ इंडिया | १६११ | ९११९ | १००५४ | १६५४ | ११७३६ | २६८७० | ४९८७ | ८७९५ | १०४८२ |
| ११ | सीडिकेंट बॅक | १९२ | ५७६ | २९९ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १२ | युनायटेड कर्मशियल बॅक | ६७ | ४८८ | ४०० | १८१ | ९६१ | १०९९ | ११७ | ८८५ | ७६० |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | युनियन बॅक ऑफ इडिया | २६१० | २२५३ | ८३५ | ८४६ | १२१० | १३४१ | २६०३ | २३५३ | १५२७ |
| | एकुण | **१९७३६** | **३५२६७** | **२३७८८** | **२२५६५** | **४४८२५** | **४३३१०** | **३२५०१** | **४१४००** | **२४३०८** |
| | विदर्भ कोकन ग्रामिण बॅक | ४२८३ | ४४५१ | ४१७९ | ५०१४ | १५४५ | ८२०९ | ५४६५ | ६८२९ | ३७३९ |

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की २०१९—२० ते २०२१—२२ या तिन वर्षाच्या कालावधीत गोंदिया जिल्हयातील इतर राष्ट्रीयीकृत बॅकेच्या तुलनेत विदर्भ कोकण ग्रामीण बॅकेने खालील क्षेत्राला कर्जपुरवठा करुन आर्थिक विकासाला हातभार लावला असे दिसुन येते. यामध्ये कृषी व कृषी सलग्न क्षेत्र, लघु व कुटीर उद्योग व अन्य प्राथमिक क्षेत्र.

वरील आकडेवारीवरुन असे लक्षात येते की, इतर राष्ट्रीयीकृत बॅकेच्या तुलनेत विदर्भ कोकण ग्रामीण बॅकेचा कर्जपुरवठा प्राथमिक क्षेत्राला जास्त झाल्याचे दिसुन येते.

१) **२०१९—२० ते २०२१—२२** या कालावधीत इतर राष्ट्रीयीकृत बॅकेने कृषी व कृषी सलग्न क्षेत्राला केलेला कर्जपुरवठा २०१९—२० या वर्षी, १९७३६ लाख, २०२०—२१ या वर्षी २२५६५ लाख, २०२१—२२ या वर्षी ३२५०१ लाख आहे. यांच्या तुलनेत विदर्भ कोकण ग्रामीण बॅकेचा झालेला कर्जपुरवाठा २०१९—२० या वर्षी ४२८३ लाख, २०२०—२१ या वर्षी ५०१४ लाख, २०२१—२२ या वर्षी ५४६५ लाख असल्याचे दिसून येते.

२) **२०१९—२० ते २०२१—२२** या कालावधीत इतर राष्ट्रीयीकृत बॅकेने लघु व कुटीर उद्योग या क्षेत्राला केलेला कर्जपुरवठा २०१९—२० या वर्षी ३५२६७ लाख, २०२१—२२ या वर्षी ४४८२५ लाख, २०२१—२२ या वर्षी ४१४०० लाख आहे. यांच्या तुलनेत विदर्भ कोकण ग्रामीण बॅकेने केलेला कर्जपुरवठा २०१९—२० या वर्षी ४४५१ लाख, २०२०—२१ या वर्षी १५४५ लाख तर २०२१—२२ या वर्षी ६८२९ लाख असल्याचे दिसुन येते.

३) **२०१९—२० ते २०२१—२२** या कालावधीत इतर राष्ट्रीयीकृत बॅकेने अन्य प्राथमिक क्षेत्राला केलेला कर्जपुरवठा २०१९—२० या वर्षी २३७८८ लाख, २०२०—२१ या वर्षी ४३३१० लाख, २०२१—२२ या वर्षी २४३०८ लाख आहे. याच्या तुलनेत विदर्भ कोकण ग्रामीण बॅकेने केलेला कर्जपुरवठा २०१९—२० या वर्षी ४१७९ लाख, २०२०—२१ या वर्षी ८२०९ लाख, तर २०२१—२२ या वर्षी ३७३९ लाख इतका आहे.

आकडेवारीवरुन बॅकेनी कृषी व कृषी संलग्न क्षेत्र, लघु व कुटीर उद्योग व अन्य प्राथमिक क्षेत्राला तीन वर्षात कर्जपुरवठा केला आहे. ग्रामिण क्षेत्रात कृषीचा विकास करण्यासाठी कर्जाची रक्कम २०२१—२२ या वर्षात वाढत गेली आहे. तर लघु व कुटीर उद्योगाचा कर्जपुरवठा वाढून ग्रामिण रोजगार वाढीसाठी मदत झाली आहे आणि प्राथमिक क्षेत्राचा कर्जपुरवठा कमी अधिक प्रमाणात झाला आहे. यावरुन असे लक्षात येते की जिल्हयाच्या आर्थिक विकासात बॅकेने भरीव योगदान केले आहे.

**गोंदिया जिल्हयात विदर्भ कोकण ग्रामीण बॅकेच्या एकूण २४ शाखा असून तालुका निहाय शाखा खालील**

**प्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| १. | आमगाव तालुका | – आमगाव ,कालीमाती |
| २. | अर्जुनी/मोरगाव तालुका | – अर्जुनी/मोरगाव, बोडगाव देवी, महागाव |
| ३. | देवरी तालुका | – देवरी, ककोडी |
| ४. | गोंदिया तालुका | – गोंदिया, रावणवाडी ,कंटगीकला, अदासी, फुलचूर ,दासगाव |
| ५. | गोरेगाव तालुका | – गोरेगाव ,कुन्हाडी, चोपा |
| ६. | सडक अर्जुनी तालुका | – सडक अर्जुनी, पांढरी |
| ७. | सालेकसा तालुका | – सालेकसा, कावराबांध |
| ८. | तिरोडा तालुका | – तिरोडा, मुरमाडी ,सुकळी |

**निष्कर्ष :**

**सारणी** :

**१.** वरुन असे लक्षात येते की, बॅकेचे कर्ज यात वाढ होत गेलेली आहे. व लघु व कुटीर उद्योग–गात कर्जपुरवठयात वाढ दिसुन येत आहे.

**२.** वरुन असे लक्षात येते की, जिल्हानिहाय कर्जपुरवठा हा लाखात झालेला आहे. एकूण तिन वर्षातील कृषी व कृषी संलग्न क्षेत्र लघु व कुटीर उद्योग आणि अन्य प्राथमिक क्षेत्राला दिलेले कर्ज कमी अधिक प्रमाणात दिलेले आहे.

**३.** वरुन असे लक्षात येते की, बॅक निहाय व क्षेत्र निहाय कर्जपुरवठा २०२१–२२ मध्ये कृषी व कृषी संलग्न क्षेत्र व लघु व कुटीर उद्योगत वाढ आणि अन्य प्राथमिक क्षेत्राला करण्यात आलेला कर्जपुरवठा कमी अधिक प्रमाणात दिसुन येतो.

**उपाययोजना** :

गोंदिया जिल्हयाच्या विकासाकरीता विदर्भ कोकण ग्रामिण बॅकेने खालील उपाययोजना कराव्यात जेणेकरुन गोंदिया जिल्हयाच्या विकासात योगदान राहील.

१. कृषी क्षेत्राला कर्जपुरवठा वाढविण्यात यावा. विशेषकरुन पिक कर्ज ,विहीर खोदने, मोटरपंप बसविने, कृषी संलग्न क्षेत्राला कर्जपुरवठा करणे यावर बॅकेने भर दिला पाहिजे.

२. लघु व कुटीर उद्योगाचा विकासाकरीता बॅकेने प्रत्यक्ष रक्कम न देता वस्तु खरेदी करुन देण्यात याव्यात.

३. अन्य प्राथमिक क्षेत्राला कर्जपुरवठा करीत असतांना कर्ज बुडणार नाही. या करीता बॅकेने लक्ष दयावे.

**संदर्भ :**


- भारतीय अर्थव्यवस्था – डॉ. सुदामा सिह, डॉ. राजीव कृष्ण सिंह – राधा पब्लिकेशन, नवी दिल्ली
- मुद्रा एवं वित्तीय प्रणाली – प्रा. आई.वी त्रिवेदी ,डॉ. राकेश दशोरा, डॉ. अशोक नागर, डॉ.

संजय जैन – रमेश बुक डेपो, नवी दिल्ली

- अधिकोषण आणि वित्तीय प्रणाली – डॉ. ज्योत्स्ना देशंपाडे – पिंपळापुरे अॅन्ड कं.पब्लिशर्स नागपुर
- ग्रामीण वित – डॉ. बी एल माथूर – अर्जुन पब्लीशिंग हाऊस, दिल्ली
- जिल्हा साख योजना २०१९–२० बॅंक ऑफ इंडीया – जिल्हा गोंदिया
- जिल्हा साख योजना २०२०–२१ बॅंक ऑफ इंडीया – जिल्हा गोंदिया
- जिल्हा साख योजना २०२१–२२ बॅंक ऑफ इंडीया – जिल्हा गोंदिया